CMYK

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com arambhmarathi535@gmail.com DAILY ARAMBH MARATHI

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 1 ले ■ अंक 80 वा ■ रविवार, दि. 21 एप्रिल 2024 ■ TITLE CODE-MAHMAR52255 ■ पाने 4 ■ किंमत रू. 5

**काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण!**

>> पान 2

**येडेश्वरीदेवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेची तयारी पूर्ण**

>> पान 4

**सुविचार**

**संकटं टाळणं माणसाच्या हाती नसतं,
पण संकटाचा सामना करणं,
त्याच्या हातात असतं.**

**हॉल विकणे आहे**

धाराशिव येथील जिजाऊ चौकातील मध्यवर्ती ठिकाणी असलेला 40x50 आकाराचा सर्व सोईने युक्त हॉल विकणे आहे.


– संपर्क –

**9890131200**

# धो धो बरसला अवकाळी,शेतशिवारांमध्ये पाणीच पाणी









- तुळजापुरात कहर, मंदिरासह आराधवाडी भागात घरांमध्ये शिरले पाणी
- धाराशिवसह उमरगा, लोहारा भागाला जोरदार पावसाचा तडाखा
- वादळाने आंब्यासह फळबागांचे प्रचंड नुकसान, पंचनाम्याची मागणी
- तारा तुटल्या, विजेचा खेळखंडोबा, झाडे उन्मळून पडल्याने रस्ते बंद

**टीम आरंभ मराठी/धाराशिव**

धाराशिव शहरासह तालुक्यात तसेच तुळजापूर, उमरगा, लोहारा भागात शनिवारी सायंकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह,विजेच्या कडकडाटात मुसळधार पाऊस झाला. प्रचंड वादळाने अनेक भागात झाडे उन्मळून पडली असून घरे शाळांवरील पत्रे उडून गेले आहेत. विजेचे खांबही उन्मळून पडल्याने तारा तुटून विविध ठिकाणी विज पुरवठा खंडित झाला आहे. आजवरच्या इतिहासात अवकाळी पावसामुळे प्रथमच तुळजाभवानी मंदिरासह परिसरातील आराधवाडी भागात अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून, त्यामुळे भाविकांसह नागरिकांची तारांबळ उडाली. तुळजापूर शहरासह ग्रामीण भागात तसेच उमरगा, लोहारा तालुक्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस झाल्याने सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. प्रचंड वादळाने विशेषतः आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



## उमरगा , लोहारा तालुक्यांना फटका

शनिवारी सायंकाळी लोहारा तसेच उमरगा तालुक्यातील काही गावांमध्ये जोरदार अवकाळी पाऊस झाला. या पावसाने शेतातून पाणी बाहेर पडले. जोरदार पावसाने सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. विशेषतः आंबा पिकाचे प्रचंड मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काढणीला आलेल्या कांदा तसेच ज्वारी पिकाचेही पावसाने प्रचंड नुकसान झाले आहे.पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

## धाराशिव शहरासह परिसरात जोरदार पाऊस

शनिवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास धाराशिव शहरात तसेच परिसरात वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटात जोरदार वादळी पाऊस झाला या पावसाने अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली तर तर विजेच्या तारा तुटल्याने वीज पुरवठा टप्प झाला रात्री उशिरापर्यंत धाराशिव शहर आणि ग्रामीण भाग अंधारात होता. धाराशिव तालुक्यातील ढोकीसह परिसराला अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे.शनिवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह आलेल्या अवकाळी पावसाने ढोकीसह परिसरातील आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले असून त्यासोबतच उशिरा पेरा झालेल्या ज्वारी पिकाचे मोठे नुकसान केले आहे. वादळी वाऱ्याने अनेक ठिकाणी पत्रे उन्हाळ्याच्या घटना घडल्या असून वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत होता. आळणी जिल्हा परिषद शाळेच्या भिंतीला वादळाने तडे गेले असून, वादळाने शाळेचे पत्रे उडाले आहेत. जोराच्या वादळामुळे जिल्हा परिषद शाळेच्या दोन वर्ग खोल्यावरील पत्रे उडून, भिंतीला तडे गेले आहेत. एका वर्ग खोलीत मतदान बूथ आहे.

## तुळजाभवानी मंदिरात पाणी

**सूरज बागल/आरंभ मराठी**

**तुळजापूर** : तुळजापूरसह तालुक्यातील अनेक गावात विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाने हजेरी लावली. तब्बल एक ते दीड तास मोठा पाऊस पडल्याने सगळीकडे पाणी पाणी झाले होते. तुळजापूर शहरात अनेक ठिकाणी गटारीचे पाणी रस्त्यावर आल्याने भाविकासह नागरिकांना घाणीतून वाट काढावी लागली. मंदिरासमोर हे घाण पाणी साचल्याने भाविकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. मंदिरच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करून चेंबरमधील अडकलेला कचरा काढून पाण्याला वाट मोकळी करून दिली. ग्रामीण भागात अनेक आंबा बागायतदारांना या पावसाचा मोठा फटका बसला. आंबा पिकासह भाजीपाला तसेच काढून पडलेल्या ज्वारी पिकास याचा मोठा फटका बसला तसेच विजा सह वाऱ्याने देखील हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला होता. पावसाच्या जोरदार बॅटिंगने तुळजापूर शहरात अनेक ठिकाणी तळ्याचे स्वरूप आले होते.

# महात्मा फुले समता परिषदेची भूमिका, भुजबळ सांगतील त्यांनाच मतदान

**आरंभ मराठी/धाराशिव**

दिल्लीतील भाजप नेत्यांचे आदेश असूनही नाशिक लोकसभेची जागा आमचे नेते छगन भुजबळ यांना देण्याबाबत राज्यातील महायुतीच्या नेत्यांकडून तीन आठवड्यात कुठलाही निर्णय होत नसल्याने याचा फायदा समोरच्या विरोधी उमेदवाराला होत होता. त्यामुळे पक्ष हितासाठी भुजबळ यांनी निवडणूकीतून माघार घेतली. मंत्री भुजबळ यांच्याबाबत जाणीवपूर्वक उमेदवारी देण्यास विलंब केला. त्यामुळे राज्यभरातील



ओबीसीमध्ये संभ्रम आहे. त्यामुळेच भुजबळ सांगतील त्यालाच लोकसभा निवडणुकीत मतदान टाकू अन्यथा बहिष्कार टाकू असा निर्णय धाराशिव येथील अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद कार्यकर्ता व ओबीसी समाजाचे काही प्रमुख कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला आल्याची माहिती समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत यांनी दिली.

धाराशिव येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद कार्यकर्ते व काही ओबीसी समाजाचे प्रमुख कार्यकर्ते यांची बैठक झाली. या बैठकीत नाशिक येथील लोकसभेची उमेदवारी छगन भुजबळ यांना देण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी ठरवले होते. मात्र महायुतीच्या नेत्यांनी सदरील जागा देण्याबाबत जाणीवपूर्वक विलंब केला. त्यामुळे राज्यात व मराठवाड्यात ओबीसी समाजामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यामुळे भुजबळ सांगतील त्यालाच आपण मतदान टाकू अन्यथा होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकू असे सवार्नुमते ठरविण्यात आले आहे.यावेळी धाराशिवचे जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, परंडा तालुकाध्यक्ष दीपक भोसले, कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठक, तुळजापूर तालुकाध्यक्ष प्रदीप राऊत, लोहारा –उमरगा तालुकाध्यक्ष राम जाधव, भूम तालुकाध्यक्ष सचिन माळी, शहराध्यक्ष रवी गोरे–माळी, परंडा शहराध्यक्ष ज्योतीराम अलबत्ते, जिल्हा संघटक अशिष माने यांची उपस्थिती होती.


CMYK

## अहिंसेचे प्रतीक भगवान महावीर

जैन धर्माचे चोविसावे तीर्थांकर अहिंसेचे मूर्तिमंत प्रतीक भगवान महावीर यांची आज जयंती. भगवान महावीर यांचा जन्म वैशाली राज्याच्या कुंडलपूर येथे इसवी सन पूर्व ५९९ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सिद्धार्थ तर आईचे नाव त्रिशला असे होते. त्यांच्या भावाचे नाव नंदिवर्धन तर बहिणीचे नाव सुदर्शना असे होते. त्यांचे बालपण राजेशाही थाटात गेले. भगवान महावीर आठ वर्षाचे असताना त्यांना शिक्षण आणि शस्त्र विद्येचे प्रशिक्षण घेण्यासाठी शाळेत पाठवण्यात आले. भगवान महावीरांचे कुटुंब जैनांचे तेविसावे तीर्थांकार भगवान पार्श्र्वनाथ यांचे अनुयायी होते. भगवान महावीर २८ वर्षाचे असतानाच त्यांच्या आईवडीलांचे निधन झाले त्यानंतर त्यांनी श्रामणी दीक्षा घेतली आहे. त्यानंतर काही दिवसांनी त्यांना आत्मज्ञान प्राप्त झाले. त्यांनी १२ वर्ष मौन पाळले. हटयोग्याप्रमाणे त्यांनी शरीराला कष्ट दिले. ज्ञानप्राप्तीनंतर त्यांनी जनकल्याणासाठी उपदेश देण्यास सुरुवात केली त्यासाठी त्यांनी त्याकाळी प्रचलित असणारी अर्धमागधी भाषेचा आधार घेतला. इंद्रिय व विषय वासनेचे सुख दुसऱ्याला दुःख देऊनच मिळवता येते असे त्यांचे मत होते त्यामुळेच त्यांनी जैन धर्माच्या अहिंसा, सत्य, अस्तेय, अपरिग्रह याबाबींमध्ये ब्राम्हचर्याचाही समावेश केला. त्याग संयम, प्रेम, करुणा, शील व सदाचार हे त्यांच्या प्रवचनाचे सार होते. त्यांनी चतुर्वेध संघाची स्थापना करुन समता हेच जीवनाचे लक्ष असल्याचे सांगितले. देशात ठिकठिकाणी फिरून भगवान महावीरांनी या पवित्र संदेशाचा प्रसार केला. इसवी सन पूर्व ५२७ मध्ये बिहार मधील पावापुरी येथे वयाच्या ७२ व्या वर्षी त्यांचे निर्वाण झाले. तो दिवस होता कार्तिक कृष्ण अमावस्येचा. भगवान महावीरांच्या जन्म आणि निर्वाण दिनादिवशी घराघरात दिवे लावले जातात. भगवान महावीर म्हणतात की, जाणते किंवा अजाणतेपणातून कोणाची हिंसा करणे योग्य नाही. याशिवाय दुसऱ्याच्या मार्फतही कोणाची हिंसा घडवून आणू नये कुठल्याही जीवांना मन, शरीर किंवा बोलण्याने दंडित करू नये. सर्वांच्या आत एकच आत्मा आहे. आपल्या प्रमाणेच प्रत्येक प्राण्यांना आपापले प्राण प्रिय आहे त्यामुळेच कोणत्याही प्राण्यांप्रति हिंसा करू नये. स्वतः हिंसा करणारा, दुसऱ्यांकडून हिंसा घडवून आणणारा व दुसऱ्याने केलेल्या हिंसेचे समर्थन करणारा स्वतःप्रति द्वेष वाढवत असतो असे तेच मत होते. कोणत्याही प्रकारची हिंसा न करणे हीच ज्ञानाची खरी परिभाषा आहे. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानाची व्याख्या केली आहे. आपल्या आत्म्याविषयी असणारा भाव इतर प्राण्यांविषयी असू द्या. सर्व प्राणिमात्रांविषयी अहिंसेचा भाव राखा मन, वाणी आणि शरीराने कोणाचीही हिंसा न करणारा खरा संयमी म्हणून गणला जातो अशी संयमी माणसाची व्याख्या त्यांनी केली. चालताना, बसताना, बोलताना, जेवण करताना असावध असणारा, स्वतःची पूर्ण खात्री झाल्याशिवाय, पहिल्या व विचार केल्याशिवाय कृती करणारा हिंसा करत असतो असे त्यांचे मत होते. दुःखास सर्वच जीव घाबरत असतात हे लक्षात घेऊन कोणत्याही जीवास कष्ट पोहचवणे टाळावे असे ते आपल्या प्रवचनात नेहमी सांगत.

## यश मिळवण्यासाठी गाढवाच्या तीन गोष्टी लक्षात ठेवा, जाणून घ्या काय सांगते चाणक्यनिती...

आचार्य चाणक्य यांनी आपल्या नीतिशास्त्रात जीवनातील विविध गोष्टींवर प्रकाश टाकला आहे. त्यांनी जीवनाबाबत म ांडलेली तत्त्व अजूनही तंतोतंत लागू होतात. त्यामुळे चाणक्य नीतिबाबत आजही चर्चा होत असते. आचार्य चाणक्य यांना राजकारण आणि नीतिमत्ता यांची चांगली परख होती. कधी कधी आयुष्यातल्या छोट्या छोट्या गोष्टी खूप काही शिकवून जातात.



अशा परिस्थितीत शिकण्यासाठी नेहमीच वाव असतो. आचार्य चाणक्य यांच्यानुसार, एखाद्या व्यक्तीने गाढवाकडून काही गोष्टी शिकल्या पाहिजेत. यामुळे जीवनात यश मिळू शकते. गाढवाकडून तीन गोष्टी शिकल्या पाहिजेत असे आचार्य चाणक्य सांगतात.

आयुष्यात समाधानी राहा: आचार्य चाणक्य यांच्या नीतिशास्त्रानुसार गाढव जीवनातील प्रत्येक गोष्टीत सम ाधानी असतो. कुठेही काहीही द्या चालत असतो. त्याचप्रम ाणे ज्ञानी माणसाने सुद्धा प्रत्येक गोष्टीत समाधानी असले पाहिजे. निकालाची काळजी करू नका, फक्त मेहनत आणि प्रामाणिकपणे तुमचे काम करा. यश एक दिवस नक्कीच पायाशी येईल.

आळस सोडून द्या: चाणक्य म्हणतो की प्रत्येकामध्ये काहीतरी खास असते. त्याचप्रमाणे गाढवामध्येही एक गुण आहे की, त्याला आळस नसतो. थकलेले असूनही गाढव ओझे वाहून नेतो. त्याचप्रमाणे हुशार व्यक्तीही आळस न करता आपले ध्येय साध्य करू शकते. यासोबतच व्यक्तीने आपल्या ध्येयापासून कधीही विचलित होऊ नये.

काम करत राहणं: जसे गाढव प्रत्येक स्थितीत आपले काम करत असते. त्याच्यावर थंडी किंवा उष्णतेचा अजिबात परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे माणसाने हवामानाची चिंता न करता काम करत राहावे. जर एखादी व्यक्ती हवाम ानातील बदलामुळे विचलित झाली असेल तर ते त्यांचे ध्येय गमावू शकतात.

# काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण!

## मुहम्मद इक्बाल स्मृतीदिन विशेष

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले. त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वतःचा विकास स्वतःच करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते.

सर मुहम्मद इक्बाल हे उर्दूचे व फार्सीचे एक थोर कवी व विचारवंत होते. इक्बाल हे त्यांचे कवितेतील टोपणनाव होय. त्यांचे पूर्वज काश्मीरी ब्राह्मण होते. इक्बाल यांचा जन्म दि.२२ फेब्रुवारी १८७३ रोजी सियालकोट येथे झाला. सिलायलकोट येथील मरे कॉलेजमध्ये त्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण झाले व लाहोर येथून त्यांनी तत्त्वज्ञानात एमएची पदवी घेतली. नंतर जर्मनीतील म्यूनिक येथे जाऊन त्यांनी तत्त्वज्ञानात डॉक्टरेट मिळविली. इंग्रजी, जर्मन, फार्सी आणि उर्दू या चार भाषांवर त्यांचे अगाध प्रभुत्व होते. सन १९०८ साली ते इंग्लंडहून बॅरिस्टर होऊन स्वदेशी परतले. सुरुवातीस त्यांनी लाहोर कॉजेलातील प्राध्यापकाची नोकरी पत्करली. परंतु थोड्याच दिवसांत ती सोडून दिली व शेवटपर्यंत वकिलीचा व्यवसाय केला. लहानपणापासून ते कविता करीत होते. त्यांच्यावर सुरुवातीस सूफी विचारांचाही प्रभाव होता. हिदायतु-उल् इस्लाम या संस्थेच्या सभांमधूनही ते आपल्या कवितांचे वाचन करीत. आपली ओजस्वी आणि राष्ट्रीय कविता त्यांनी सुरुवातीच्या काळातच लिहिली ती अशी-

सारे जहाँसे अच्छा;<br>
हिंदोस्ताँ हमारा<br>
हम बुलबुले है जिसकी;<br>
यह गुलसिताँ हमारा!!

युरोपातील तीन वर्षांच्या वास्तव्याने त्यांचा आरंभीचा राष्ट्रीय दृष्टिकोन सर्वस्वी बदलला आणि ते पूर्ण इस्लामवादाकडे वळले. त्यावेळी तुर्कस्तानची स्थिती आणि सत्ता डळमळीत झालेली होती, इराणवर रशियाचा डोळा होता आणि उत्तर आफ्रिकेच्या ट्रिपोलीवरील मुसलमानी सत्ता संपुष्टात आली होती. इस्लामच्या या अवनतीच्या काळातच त्यांनी आपली प्रसिद्ध व हृदयस्पर्शी कविता लिहिली. सर्व इस्लामवादाचा गडद प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर असल्यामुळे ते नंतर उर्दूऐवजी फार्सीत लेखन करू लागले. फार्सीचा आश्रय घेतल्याने आपले लेखन व तत्त्वज्ञान यांचा प्रसार सर्व इस्लामी राष्ट्रांत होऊ शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्यांच्या तात्त्विक विचारसरणीवर आंरी बेर्गसाँ आणि फ्रीड्रिख नीत्शे यांच्या विचारांचा पगडा होता. हे त्यांच्या असरारे खुदी आणि रूमूजे बे खुदी या दोन फार्सी खंडकाव्य- मस्नवींवरून स्पष्ट दिसते. या दोन्ही मस्नवींचा इंग्रजी अनुवाद केंब्रिजचे प्राध्यापक निकल्सन यांनी केला. इक्बाल यांना सन १९२२मध्ये सर हा किताबही या ग्रंथांमुळेच बहाल करण्यात आला. त्यांच्या लेखनाला जागतिक कीर्ती लाभली. दांतेकृत डिव्हाइन कॉमेडीच्या धर्तीवर त्यांच्या फार्सी काव्यांचे पयामे मशरिक आणि जावेदनामा हे संग्रह निघाले. सन १९३५पासून ते पुन्हा उर्दूत लेखन करू लागले. बाले जिब्रैल आणि जर्बे-कलीम हे दोन उर्दू काव्यसंग्रह त्यांनी आयुष्याच्या अखेरीअखेरीस लिहिले. त्यांच्या प्रगत विचारांचे दर्शन या संग्रहांतून घडते. त्यांच्या आरंभीच्या उर्दू कविता बाँगे दरा या संग्रहात आहेत. हैदराबाद, म्हैसूर, मद्रास व अलीगढ येथे त्यांनी इंग्रजीत जी व्याख्याने केली, त्यांचा संग्रह लेक्चर्स ऑन द रिकन्स्ट्रक्शन ऑफ रिलिजस थॉट इन इस्लाम या नावाने प्रसिद्ध झाला. इस्लाम धर्मावरील त्यांचे महत्त्वाचे तात्त्विक विचार त्यात आलेले आहेत. त्यात त्यांनी आपले सूफीविरोधी आणि कर्मयोगाची शिकवण देणारे तत्त्वज्ञान मांडले आहे. जगातील सर्व मुसलमानांनी संघटित व्हावे व कुराणप्रणीत आचरण ठेवावे. राष्ट्रीयतेची भावना इस्लामला मारक आहे. पाश्र्चत्त्य संस्कृती निसर्गरहस्ये उलगडण्याची धडपड करीत असली, तरी तिला परमेश्र्वरी निष्ठेचे अधिष्ठान नाही. लोकसत्ताक पद्धती निरर्थक आहे, कारण तीत केवळ माणसे मोजली जातात, त्यांचे मूल्यामापन होत नाही. अशी मते त्यांनी आग्रहपूर्वक प्रतिपादिली आहेत. सारे जहाँसे अच्छा यासारख्या ओळी सुरुवातीस लिहिणारे इक्बाल आता अशा ओळी कोरू लागले-

चिनो अरब हमारा,<br>
हिंदोसिताँ हमारा!<br>
मुस्लीम हैं हम, वतन हैं<br>
सारा जहाँ हमारा!!



**श्री. एन. के. कुमार गुरूजी**<br>
मु. पो. ता. जि. गडचिरोली.<br>
मोबा.नं. ७७७५०४१०८६.

सर मुहम्मद इक्बाल हे सन १९३०मध्ये मुस्लिम लीगचे अध्यक्ष निवडले गेले आणि त्यांनी मुसलमानांसाठी स्वतंत्र पाकिस्तानची योजना मांडून ती कार्यान्वित होण्याची मागणी केली. त्यांच्या काव्यात तात्त्विक, धार्मिक, नैतिक, राजकीय विचारांचा मिलाफ व कलात्मक आविष्कार आढळतो. कवी व तत्त्वज्ञ अशा दोन्ही भूमिकांचा त्यांच्या काव्यात आविष्कार असल्यामुळे त्यांच्या काव्याबाबत टीकाकारांत तीव्र मतभेद आहेत. त्यांच्या काव्यावर आतापर्यंत अनेक टीकाग्रंथ लिहिले गेले. मानवाच्या अमर्याद आत्मशक्तीवर त्यांच्या तत्त्वज्ञानात विशेष भर दिलेली आढळते. स्वप्रयत्नाने आणि चारित्र्याने माणूस स्वतःचा विकास स्वतःच करू शकतो, अशी त्यांची धारणा होती. उर्दूपेक्षा त्यांचे फार्सी काव्यलेखन अधिक दर्जेदार व महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या काव्याला उर्दू फार्सीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यांचे दुःखद निधन दि.२१ एप्रिल १९३८ रोजी झाले.

!! स्मृतिदिनी सर मुहम्मद इक्बाल यांना व त्यांच्या अचाट काव्यशैलीला मानाचा सॅल्युट !!

## मासिक पाळी दरम्यान व्यायाम करणे स्त्रियांसाठी किती आहे फायदेशीर? जाणून घ्या तज्ञांकडून

व्यायाम करणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. यामुळे अनेक प्रकारचे आजार टाळता येतात. डॉक्टर दिवसातून किमान १५ मिनिटे व्यायाम करण्याचा सल्ला देतात. पण मासिक पाळीदरम्यान हलका वर्कआऊट करता येऊ शकतो, असे डॉक्टरांचे म्हणणे असले तरी मासिक पाळीदरम्यान व्यायाम करणे महिला टाळतात. जर स्त्रीला कोणतीही सम स्या नसेल आणि गंभीर आजाराची समस्या नसेल, तर ती व्यायाम करू शकते. याचा फक्त शरीराला फायदा होतो. पीरियड दरम्यान महिला कोणत्या प्रकारचे वर्कआउट करू शकतात आणि त्यांचे काय फायदे आहेत हे जाणून घेऊया तज्ञांकडून.



याबाबत स्त्रीरोगतज्ञ सांगतात की मासिक पाळी दरम्यान व्यायाम करता येतो, पण तो खूप कमी तीव्रतेचा असावा. मासिक पाळी दरम्यान दररोज व्यायाम करणे देखील आवश्यक नाही. यादरम्यान एक दिवस योगासनेही करता येतात. यामुळे मासिक पाळीच्या दरम्यान पेटके आणि सूज येण्यापासून आराम मिळू शकतो.

स्त्रीरोगतज्ञ सांगतात की, पीरियडच्या काळात शरीरात अनेक प्रकारचे बदलही जाणवतात, जे व्यायामाने कमी करता येतात. व्यायाम केल्याने शरीरात फील-गुड हार्मोन्सची पातळी वाढते. यामुळे मूड चांगला राहतो आणि मानसिक ताणही कमी होतो.

मात्र, या काळात फक्त तेच व्यायाम करावेत जे तुम्ही आरामात करू शकता. मासिक पाळीच्या पहिल्या दिवशी हे टाळावे. कारण या दिवशी भारी फळ असते. अशा परिस्थितीत वर्कआउट करणे योग्य नाही.

हा एक सोपा व्यायाम आहे ज्याम ध्ये कोणतीही विशेष समस्या नाही. हे घरी किंवा बाहेर कुठेही करता येते. हळू चालत जा आणि किमान १० ते १५ मिनिटे चालावे. यासोबतच हलका एरोबिक व्यायाम ही करता येतो, मात्र पीरियडमध्ये पोटात तीव्र वेदना होत असतील तर व्यायाम टाळावा. या प्रकरणात डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

मासिक पाळीत बराच वेळ व्यायाम करू नका. अर्ध्या तासात तुमचा व्यायाम पूर्ण करा. दीर्घकाळ असे करणे हानीकारक ठरु शकते. कोणताही आजार असला तरी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच व्यायाम करा. स्वतःहून कधीही भारी कसरत करू नका. असे करणे हानिकारक ठरू शकते.

## लस उपलब्ध असूनही, हिपॅटायटीस बी का आहे धोकादायक

आज जगभरात जागतिक हिपॅटायटीस दिवस साजरा केला जात आहे. हिपॅटायटीस आजाराबाबत लोकांना जागरूक करणे हा त्याचा उद्देश आहे. हा एक दशक जुना आजार आहे, तरीही दरवर्षी या रोगाच्या लाखो केसेस समोर येतात. या आजारापासून बचाव करण्यासाठी लस देखील उपलब्ध आहे, परंतु तरीही ती खूप घातक आहे. या आजारामुळे यकृत पूर्णपणे खराब होऊ शकते. कर्करोग होण्याचाही धोका असतो.

लस असूनही हा आजार इतका धोकादायक का आहे हा मोठा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्याआधी हिपॅटायटीस म्हणजे काय आणि कधी होतो हे जाणून घेऊया.

काय आहे हिपॅटायटीस

हिपॅटायटीस हा यकृताचा आजार आहे. सुरुवातीला यकृतावर सौम्य सूज येते. हा आजार विषाणूमुळे किंवा यकृताला झालेल्या नुकसानीमुळे होतो. हा आजार व्हायरल हेपेटायटीसपासून सुरु होतो. हा त्याचा सर्वात सामान्य प्रकार आहे. हे अनेक विषाणूंपैकी एकामुळे होते. हिपॅटायटीसचे विषाणू अ, ॅ, ण, आणि ए असे पाच प्रकार आहेत. यापैकी हिपॅटायटीस ॅ आणि ण हे जास्त धोकादायक आहेत. यामध्ये मृत्यूचे प्रमाणही जास्त आहे.

यकृतावर हल्ला करते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती

फोर्टिस हॉस्पिटलमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हेपॅटोबिलरी सायन्सेस विभागातील डॉक्टर स्पष्ट करतात की जर हिपॅटायटीसवर वेळेवर उपचार केले गेले नाहीत, तर तो प्राणघातक ठरू शकतो. या आजाराचे अनेक प्रकार आहेत. यामध्ये अल्कोहोलिक हिपॅटायटीस हा अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे होतो. यामध्ये ऑटोइम्यून हिपॅटायटीस अतिशय धोकादायक आहे. हा एक जुनाट आजार आहे, ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती यकृतावर हल्ला करते. हिपॅटायटीस आजारामुळे यकृतालाही पूर्णपणे नुकसान होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, यामुळे यकृत निकामी आणि यकृताचा कर्करोग देखील होऊ शकतो. हे कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना सहजपणे बळी बनवते. हे टाळण्यासाठी, लक्षणे वेळेवर ओळखणे आणि उपचार करणे आवश्यक आहे.

काय आहेत लक्षणे

- वारंवार कमी ताप
- भूक न लागणे
- सतत ओटीपोटात दुखणे
- नेहमी थकवा
- गडद मूत्र
- त्वचा पिवळसर होणे

लस असूनही का धोकादायक आहे हा आजार ?

तज्ञ्ज डॉक्टर सांगतात की हिपॅटायटीस बी साठी एक लस आहे. मुलाच्या जन्मानंतर, ही लस १० वर्षांपर्यंत दिली जाऊ शकते. पुढील दोन डोस पहिल्या डोसच्या ६ म हिन्यांच्या आत घेतले जाऊ शकतात. प्रौढांनाही ही लस दिली जाऊ शकते. हिपॅटायटीस बी या लसीमुळे बऱ्याच प्रमाणात प्रतिबंध होतो, परंतु बहुतेक लोकांना या लसीबद्दल माहिती नसते.

यातील लोक लसीकरणापासून वंचित राहून आजाराच्या विळख्यात सापडले आहेत. काही प्रकरणांमध्ये, लोक लक्षणांकडे देखील लक्ष देत नाहीत. त्यामुळे हिपॅटायटीसचा आजार यकृत खराब करत राहतो आणि हा आजार आढळून आल्यावर परिस्थिती अत्यंत गंभीर बनते.

## तुम्ही डेटला गेल्यावर या चुका करता का? चुका टाळण्याच्या सिक्रेट टिप्स

आपण जेव्हा एखाद्या व्यक्तीला डेट करतो तेव्हा आपल्याकडून नकळत काही चुका होतात. त्या चुका कोणत्या आहेत, त्या चुका पुन्हा होऊ नयेत म्हणून काय केले पाहिजे हे आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

१. वेळ द्या -

प्रत्येक गोष्टीला वेळ देणे जसं गरजेचे आहे. तसेच नात्याच्या बाबतीतही आहे. एखादं नातं फुलवायला वेळ लागतो. पण एकदा का ते फुललं ते कायम टिकतं. जेव्हा तुम्ही डेटिंग करता तेव्हा समोरील व्यक्तीला वेळ देणे खुप महत्त्वाचे आहे. डेटिंग करत असताना दोन्ही व्यक्ती एकमेकांना जोडीदाराच्या नजरेने पाहत असतात. त्यामुळे त्याच्या विचारांना न दुखवता त्या व्यक्तीला मान दिला पाहिजे आणि आपले विचार देखील समोर मांडले पाहिजे. समोरचा व्यक्ती तुमच्या वागण्याचं परिक्षण देखील करत असते म्हणूनच असं कोणतेही गैरवर्तन करु नका.



२. ओव्हरशेअरिंग करणे टाळा -

डेटिंग करताना आपण पहिल्यांदा समोरील व्यक्तीला भेटतो. तेव्हा भावनेच्या भरात अतिरिक्त खाजगी माहिती देणे बरोबर नाही. कुठली गोष्ट कुठे बोलली पहिजे, किती बोलली पाहिजे हे आपल्यालाच समजलं पाहिजे. तुम्ही चुकीची किंवा जे बोलायचं नाही असं बोलून बसलात तर अशा वागण्याने कदाचित ती व्यक्ती तुयमच्यापासून दूर जाऊ शकेल.

३. योग्यता सिद्ध करण्याची गरज नाही -

तुम्ही त्या व्यक्तीसाठी योग्य आहात हे तुम्हाला वारंवार सिद्ध करायची गरज नाही. कोणतंही नातं तयार होण्यासाठी किंवा टिकून राहण्यासाठी त्या व्यक्तींमधील समजूतदारपणा महत्त्वाचा ठरतो. समजूतदार पण असेल तरच तुमचं नातं हेल्थी राहू शकतं. तुम्ही इतरांसोबत स्वतःची तुलना करण्यात वेळ वाया घालवू नका. नेहमी लक्षात ठेवा की डेटिंग करताना समोरील व्यक्तीला प्रभावित करण्यापेक्षा त्या व्यक्तीला व्यक्त होण्यासाठी तसे वातावरण निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

४. निवडकर्ते होऊ नका -

डेट करताना समोरील व्यक्तीची निवड करण्याऐवजी मी त्या व्यक्तीसाठी योग्य आहे का? असा प्रश्न स्वतःला विचारा. एखाद्याची निवड करणे खुप सोपं आहे. पण आपण या त्या व्यक्तीसाठी तुम्ही खरंच योग्य आहात का याचं उत्तर शोधणे थोडं कठीण आहे.

५. काल्पनिक जगात नाही वास्तवात जगा -

डेट करताना समोरील व्यक्तीचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला याचा अर्थ असा होत नाही की ती तुमच्यासोबत पुर्ण आयुष्य घालवायला तयार आहे. त्यावेळेस काल्पनिक विचारात न जगता वास्तवात जगा.

६. थेट संवाद -

कुणाला डेट करताना तुम्ही समोरच्याने तुमच्या मनातील सर्व काही ओळखावं असं तुम्हाला वाटत असेल तर तुमची ही अपेक्षा चुकीची आहे. तुम्ही तुमच्या लिमिटेशन्स आणि तुमच्या इच्छा, भविष्यातील स्वप्न आधीच बोलून स्पष्ट करणं गरजेचं आहे. थेट बोलणं कधीही चांगलं असते.

# तुळजाभवानीच्या चैत्री यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

**आरंभ मराठी/तुळजापूर**

तुळजापूर येथील श्रीतुळजाभवानी मातेच्या चैत्री यात्रेची तयारी सुरु असून, ती अंतिम टप्प्यात आली आहे. श्रीतुळजाभवानी मंदीर, नगरपरिषद, पोलिस, आरोग्यविभाग व एसटी महामंडळासह यात्रा संबंधित विभाग तयारीवर अखेरचा हात फिरवत आहेत. श्रीतुळजाभवानी मातेचा मुख्य चैत्री पोर्णिमा सोहळा सोमवारी २३ एप्रिल रोजी संपन्न होणार आहे. यात्रा उत्सव काळात श्रीतुळजाभवानी मंदीर सलग बावीस तास दर्शनासाठी खुले असणार आहे.

चैत्री पोर्णिमा यात्रेच्या निमित्ताने येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी शहरात विविध ठिकाणी सहा पाणपोई उघडल्या जाणार आहे.

भाविकांच्या स्नानासाठी घाटशिळ वाहन तळा जवळील भवानीतिर्थ कुंड सुरु करण्यात आले आहे. भवानी तिर्थकुंड स्नानासाठी २१ तारखे पासुन खुले केले जाणार आहे. श्रीतुळजाभवानी मंदिराकडे येणाऱ्या रस्त्यावर वाहने मंदीराकडे येवू नयेत म्हणून बॅरेकेटींग लावण्यात आले आहेत. यात्रा काळात शहर दररोज तीन टप्प्यात स्वच्छ केले जाणार आहे. त्यासाठी जादा स्वछता कर्मचारी कार्यान्वित केले आहेत. शहरात दररोज पाणीपुरवठा केला जाणार आहे.

भाविकांना शुध्द पाणी मिळण्यासाठी नळदुर्ग रस्त्यावर असणाऱ्या दोन फिल्टर टाक्या स्वछ धुवुन घेतल्या आहेत. धाराशिव व नळदुर्ग रोडला दोन नव्याने वाहनतळ यात्रेसाठी उभारण्यात आले आहेत. चैत्र यात्रे निमित्त भाविकांची गर्दी लक्षात घेता दिनांक २१ एप्रिल ते २५ एप्रिल या कालावधीत भाविकांना बिडकर पायऱ्या मार्गे दर्शन मंडपात दर्शनासाठी सोडण्यात येणार आहे. देणगी दर्शन व्यवस्था बिडकर पायऱ्या मार्गे करण्यात आली आहे.




यात्रा काळात मंदीर पहाटे एक वाजता चरणतीर्थ करण्यात धर्मदर्शनार्थ खुले केले जाणार आहे.

## संक्षिप्त...

### सुदेश इंगळे यांच्या विद्यापीठ अभ्यासक्रमात निवडल्या गेलेल्या कवितांचा होणार विविध भाषांमध्ये अनुवाद

**आरंभ मराठी/धाराशिव**

धाराशिव शहरातील परिसर फाऊंडेशनचे कार्यवाहक ,प्रसिद्ध साहित्यिक सुदेश इंगळे यांच्या दोन कविता मागील वर्षी विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आल्या. डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मॉडेल कॉलेज अभ्यासक्रमात उगाच काहीतरी या कविता संग्रहातील मला तो परत भेटला ही कविता आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मॉडेल कॉलेज अभ्यासक्रमात निम्म्या रेषांचा अपरिग्रह या कविता संग्रहातील हे आपण व्हायचं नाही मला ही कविता समाविष्ट झाली होती. आता याच कवितांचा हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये अनुवाद होणार आहे. ऑगस्ट २०२४ मधे एका ऑनलाईन भाषा पोर्टलवर हे अनुवाद प्रकाशित होणार आहेत. सुदेश इंगळे यांच्या ...अन् माझा खापर ढापर mRNA या आगामी कवितासंग्रहाचीही साहित्य वर्तुळात चर्चा सुरु आहे.



### दारफळ येथे शाळा पूर्व तयारी मेळावा उत्साहात



**आरंभ मराठी/धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दारफळ येथे शुक्रवारी शाळापूर्व तयारी मेळावा घेण्यात आला. मेळाव्याचे उद्घाटन धर्मराज आबा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बिभिषण पाटील होते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश पात्र मुलांच्या पालकांचा व विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी प्रवेश पात्र २० विद्यार्थी व त्यांचे पालक माता अंगणवाडी कार्यकर्ते यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. यावेळी प्रवेश पात्र मुलांची प्रवेश दिंडी काढण्यात आली व पुष्पगुच्छ व विविध खेळणी देऊन त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर माता पालक यांचे स्वागत करण्यात आले. त्यांची उंची वजन विविध माहितीचे सात टेबल लावले होते या सात टेबलावर विद्यार्थ्यांना विविध खेळ ,माहितीद्वारे घेण्यात आले. शाळापूर्व मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षिका श्रीमती करडे रंजना, सावंत बाबू, मरफळे शिवाजी,श्रीमती हूगे भाग्यश्री, प्रदीप बोडके, शिवाजी मोरे, विजयकुमार पाटील शशिकला कापसे आदींनी सहकार्य केले.

### सांगवी मार्डी येथे प्राणप्रतिष्ठा सोहळा



**आरंभ मराठी/तुळजापूर**

तुळजापूर तालुक्यातील सांगवी मार्डी येथे श्री ज्योतिर्लिंग व काळभैरव मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजित केला असून पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. तीन दिवस चालणारा हा सोहळा २४, २५ व २६ एप्रिल रोजी पार पडणार आहे. हा सोहळा आचार्य प्रमोद पाटील पैठण व ह भ प योगी गुरु सागरनाथ महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. यामध्ये दिनांक २४ एप्रिल रोजी नगर प्रदक्षिणा तसेच यज्ञ स्थापना व कळस मिरवणूक पार पडणार आहे. २५ एप्रिल रोजी पंचकुंडी यज्ञ व श्री च्या मूर्तीचा फलनिवास तसेच ह भ प योगी गुरुसागर नाथ महाराज यांचे कीर्तन आयोजित केले आहे. २६ एप्रिल रोजी महा अभिषेक सोहळा, आरती व दुपारी महाप्रसाद होणार आहे तर सायंकाळी ज्योतिबा देवाची कथा हा कार्यक्रम होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी तसेच नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त सांगवी मार्डी ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.


## ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाचे अशोकराव मगर यांच्या हस्ते उद्घाटन



**आरंभ मराठी/तुळजापूर**

तुळजापुर येथील जिजामाता कन्या प्रशालेत शुक्रवारी जिल्हा ग्रंथालय संघ संचलित महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अशोकराव मगर यांच्या हस्ते व जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी ह भ प ज्ञानेश्र्वर पाटील महाराज, जिल्हा ग्रंथालय कार्यालय अधिकारी सुधीर आचार्य ,मुख्याध्यापिका सुरेखा मिटकरी व ग्रंथ मित्र व ग सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तुळजाभवानी प्रतिमा पूजन करून दीप पूजन करण्यात आले. यानंतर मान्यवरांचा स्वागतपर सत्कार सुर्यवंशी ,ग्रंथपाल सुरेश जोशी, वर्ग प्रमुख गोविंद खुरुद यांच्याहस्ते करण्यात आला. प्रास्ताविक भाषणात सुर्यवंशी यांनी ग्रंथपालन वर्गाचा उद्देश विशद केला. या वर्गापासून मिळणारे ज्ञान व त्याचे फायदे याची माहिती सांगितली. ज्ञानेश्र्वर पाटील महाराज यांनी मनोगतात तरुणांनी ग्रंथातील आचार व संताचे विचार आचरणात आणावेत यामुळे आपणास योग्य दिशा मिळते असे सांगितले.उद्घघाटनपर भाषणातअशोक मगर म्हणाले की, राजकारण ,समाजकारण यातून अर्थकारण घडते. संयम जिद्द व चिकाटी यावर यश मिळत असते.यासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात ढाकणे म्हणाले की, विद्यार्थ्यांना ग्रंथपालन अभ्यासक्रम हा अतिशय उपयोगी पडणारा आहे तो त्यांच्या जीवनाला एक वेगळी दिशा दाखवणारा अभ्यासक्रम आहे असे सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गोविंद खुरूद यांनी केले तर आभार सुरेश जोशी यांनी मानले. यावेळी शिक्षक कुंभार ,जयश्री गुळवे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## रामराज्य प्रतिष्ठानतर्फे राम नवमीला सामजिक उपक्रम, घेतली पोलीस भरती सराव परीक्षा





**आरंभ मराठी/धाराशिव**

रामनवमीनिमित रामराज्य प्रतिष्ठानतर्फे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला रामनवमीच्या निमित्ताने प्रतिष्ठानच्या वतीने जिल्हास्तरीय पोलीस भरती सराव पेपरचे आयोजन करण्यात आले होते. या सराव परिक्षा स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सदरील स्पर्धा पुरूष व महिला या दोन गटात घेण्यात आली होती. सदरील स्पर्धेत १५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. पुरुष व महिला गटात प्रथम, द्वितीय आणि तृतीय असे बक्षीस वितरण माजी नगरसेवक प्रदिप मुंडे, ॲड.दर्शन कोळगे, गजानन चौगुले,राणा बनसोडे,दौलत निपाणीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक करण्यात आले.या स्पर्धेत पुरुष गटात रोहित दंडनाईक यांचा प्रथम, कृष्णा नागरगोजे द्वितीय तर सुदर्शन गुरुव यांनी तिसरा क्रमांक पटकावला. तसेच मुलींच्या गटात तनुजा भोसले यांनी प्रथम क्रमांक, अंकिता यादव द्वितीय तर हर्षदा चोबे यांनी तृतीय क्रमांक मिळवला. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. रामराज्य प्रतिष्ठानच्या वतीने गणेशोत्सव काळातही सामाजिक उपक्रम राबविले जातात.

## आळणीची जिल्हा परिषद शाळा झाली हायटेक, अडीच लाखाचे डिजिटल क्लासरूम

**आरंभ मराठी/धाराशिव**

धाराशिव तालुक्यातील आळणी जिल्हा परिषद शाळेला ओएनजीसी या कंपनीने सीएसआर फंडातून प्रोजेक्टर उपलब्ध करून दिला असून, दोन लाख ६४ हजार रुपये किमतीचा हा सेटअप नुकताच कार्यान्वित करण्यात आल्यामुळे ही शाळा आता डिजिटल शाळा झाली आहे.

शाळेला ONGC कंपनीच्या CSR मधून KYAN कंपनीच्या प्रोजेक्टरच्या माध्यमातून डिजिटल क्लास रूम तयार करण्यात आली. याबाबतचा २ लाख ६४ हजार रुपये किमतीचा संपूर्ण सेटअप




कंपनीच्या प्रतिनिधींनी वर्गात कार्यान्वित करून दिला.

या प्रोजेक्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्या त्या वर्गाच्या अभ्यासक्रमातील अध्ययन अनुभव तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देता येणार आहेत. गणित, विज्ञान, भूगोल, इतिहास, इंग्रजी व इतर विषयातील विषयातील अवघड संकल्पना विद्यार्थ्यांना समजून देण्यासाठी याचा उपयोग होणार आहे. याबद्दल शाळेने जिल्हा प्रशासनाचे व ongc कंपनीचे मनापासून आभार मानले.

या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत यापूर्वीच एक इंटरक्टिव्ह बोर्ड, दहा एलईडी टीव्ही बसविण्यात आलेल्या आहेत. शाळेत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव दिले जातात. व त्यात अजून kyan कंपनीच्या प्रोजेक्टर ने भर घातली आहे या प्रोजेक्टर च्या माद्यमातून आधुनिक पद्धतीने व तंत्रज्ञानाने विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार आहे. याचा लाभ शाळेतील जवळपास २६० विद्यार्थ्यांना होईल.

## राम नवमीनिमित्त मुगाव येथे कार्यक्रम



**आरंभ मराठी/अनाळा**

परंडा तालुक्यातील मुगांव येथे रामनवमी उत्सवानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज व राम यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबीरामध्ये ५० रक्तदात्यानी रक्तदान केले. रक्त संकलन बार्शी (जि.सोलापुर ) येथील श्री. भगवंत ब्लड बँक यांनी केले. मुगाव येथील या रक्तदान शिबिराचे परिसरामध्ये कौतुक होत आहे.

# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण बीसीजी लसीकरण मोहीम

**▶ मे,जून व जुलै या कालावधीत राबविण्यात येणार ▶ १८ वर्षावरील पात्र नागरिकांनी लसीकरणासाठी पूर्व नोंदणी करून घ्यावी**



**आरंभ मराठी/धाराशिव**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत २०२५ पर्यंत भारत क्षयरोग मुक्त करण्यासाठी केंद्र शासनाने धोरण निश्र्चित केले आहे.क्षयरोग प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून TB preventive therapy (TPT) क्षयरोग प्रतिबंधात्मक औषधी देण्यात येत आहे.तसेच -BCG मोहीम केंद्र शासनाच्या आदेशान्वये धाराशिव जिल्ह्यामध्ये प्रौढ इउत्र लसीकरण करण्यात येणार आहे.

प्रत्यक्ष अडल्ट बीसीजी लसीकरण मोहीम माहे मे,जून,जुलै या कालावधीत राबवायचे आहे.या मोहिमेमध्ये पात्र लाभार्थी शोधण्याकरिता आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत २२ एप्रिल २०२४ पासून ग्रामीण व शहरी भागात घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणार आहे. तसेच या सर्वेक्षणातून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार होणार आहे. तसेच सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार असून या मध्ये संशयीत क्षयरुग्ण शोधण्यात येणार आहेत.

अडल्ट बीसीजी लसीकरणासाठी मागील पाच वर्षातील सर्व क्षयरुग्ण,मागील तीन वर्षातील क्षयरुग्णाचे सहवासीत,साठ वर्षावरील सर्व,मधुमेह रुग्ण,धुम्रपान करणारे,बॉडी मास इंडेक्स (BMI) १८ पेक्षा कमी वयाचे इत्यादी लाभार्थी पात्र आहेत. तर गरोदर माता /स्तनदा माता, सद्यस्थितीत क्षय रोगाचे उपचार घेत असलेले/ क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार (TPT) घेत असलेले, एचआयव्ही/ कर्करोग्रस्त /अवयव प्रत्यारोहण झालेल्या व्यक्ती,गंभीर आजार / दुर्धर आजार असलेले व्यक्ती,मागील तीन महिन्यात रक्त चडवलेले व्यक्ती,बीसीजी अथवा इतर कोणत्याही लसीमुळे गंभीर दुष्परिणाम झालेल्या व्यक्ती, जोखीमयुक्त वर्तन असणाऱ्या व्यक्ती इत्यादी व्यक्ती या अडल्ट बीसीजी लसीकरणासाठी अपात्र आहेत.

पात्र लाभार्थींचे मे महिन्यात प्रत्यक्ष लसीकरण होणार आहे.ह्या लसीकरण सर्व प्रशिक्षित लस टोचक (व्हॅसिनेटर) यांच्याद्वारे नियमित लसीकरण सत्राचे दिवस वगळून या लसीकरणाचे नियोजन होणार आहे. तसेच जून व जुलै महिन्यात वंचित लाभार्थ्यांना लसीकरण दिले जाणार आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. इस्माईल मुल्ला यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वी करण्याकरिता जिल्हास्तरीय अधिकारी यांची निवड करण्यात आली आहे.


तरी घरोघरी येणाऱ्या आरोग्य विभागाच्या आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करावे व जोखमीच्या गटातील १८ वर्षावरील नागरिकांनी लसीकरणासाठी कर्मचाऱ्यांकडे पूर्व नोंदणी करून घ्यावी. असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष व जिल्हा परिषद आरोग्य विभाग धाराशिव यांनी केले आहे.

# येडेश्वरीदेवीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेची तयारी पूर्ण



कल्लेश भोसले/आरंभ मराठी

येरमाळा :येरमाळा येथील प्रसिद्ध आराध्य दैवत असणाऱ्या श्री येडेश्वरी देवीची चैत्र पौर्णिमा यात्रा २३ ते २८ एप्रिल दरम्यान होत असून, मुख्य चुना वेचण्याचा कार्यक्रम बुधवारी (दि.२४) रोजी होणार आहे. या कार्यक्रमासाठी दर वर्षी राज्यभरातून बारा लाखाच्या वर भाविक दाखल होतात. त्याअनुषंगाने भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच कायदा सुवस्था राखण्यासाठी आणि भाविकांच्या सुरक्षेसाठी पोलिस प्रशासनाने पाहणी केली आहे. यात्रा काळात २३ ते २८ एप्रिल दरम्यान येरमाळ्यातून जाणाऱ्या जडवाहनांना बंदी करण्यात आली आहे. अवजड वाहणांना बाह्यवळण वाहतूक व्यवस्था केली आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी शुक्रवारी (दि.१९) रोजी आदेश देऊन वाहतुकीतील बदल व यात्रा बसस्थानक, यात्राशेडचे नकाशे प्रकाशित केले आहेत. चुना वेचण्याच्या कार्यक्रमासाठी राज्यभरासह बाहेर राज्यातून लाखोंच्या वर भाविक येतात. यात्रेत कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या सर्व विभागावर ताण असतो. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी विविध विभागांनी तयारी केली असुन, जिल्हा प्रशासन सज्ञ झाले आहे.




मंदिर ट्रस्टने शुद्ध (आर. ओ.)पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असून भाविकांना दर्शन रांगेत पाणी मिळेल अशी व्यवस्था केली आहे.मंदिर परिसर,सभामंडप या ठिकाणी ६५ तर आमराई परिसरात २० सिसीटीव्ही कॅमेऱ्यांची सोय केलेली आहे. तसेच मंदिर परिसरात पोलिसांच्या जोडीला खाजगी ६० सुरक्षा रक्षक तुकडी नेमल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले. भाविकांची पाण्याची सोय व्हावी म्हणून ग्रामपंचायतने ३० टँकर, लातूर येथील भाविक खैरमोडे यांचे १०, बार्शी येथील माजी आमदार यांच्या वतीने २० अशा ६० टँकरची सोय करण्यात आली आहे. तसेच यात्रा काळात सुरक्षेसाठी दोन अग्निशामक बंबाची व्यवस्था केल्याचे सरपंच मंदाकिनी बारकुल यांनी सांगितले.

## गैरप्रकार रोखण्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त

## आरोग्य व्यवस्था सज्ज, यात्राकाळात ३५० विशेष बसची व्यवस्था

### आरोग्य विभाग सज्ज



यात्रा काळात भाविकांच्या आरोग्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाकडून मंदिर परिसरात एक, तर आमराई परिसरात एक आणि आरोग्य केंद्रात एक आरोग्यबूथ उभारण्यात आले आहे. यासाठी वैद्यकीय अधिकारी १९, पर्यवेक्षक १०, आरोग्य सेवक २०, सेविका १०, परिचर १० अतिरिक्त कर्मचारी रुजू झाल्याचे डॉ.सचिन तेलप यांनी सांगितले.

### महावितरणची तयारी पूर्ण



महावितरण कडून यात्रेसाठी परिसरातील रोहित्र,विद्युत वाहिन्या,दुरुस्तीची कामे हाती घेतली असून पर्यायी व्यवस्था येडशी येथुन उपलब्ध आहे.शिवाय ग्राम पंचायत मागणी नुसार यात्रेतील व्यावसायिकांना वीज पुरवठा आदी कामे करणार आहे असे शाखा अभियंता स्नेहा कोंगलावर यांनी सांगितले.

### यात्रेसाठी ३५० विशेष बसची व्यवस्था



येडेश्वरी यात्रेला येणाऱ्या भाविकांसाठी परिवहन विभागाकडून यात्रास्पेशल म्हणून धाराशिव, सोलापूर विभागाच्या २०० बस, तर लातूर, बीड विभागाच्या १५० बसची व्यवस्था करण्यात आली आहे. यात्रा काळात बीड विभागाचे यात्रा शेड बिजगुनन केंद्राच्या बाजूला बीड रोडवर, लातूर, सोलापूर, धाराशिव विभागाचे बीएसएनएल उपकेंद्राजवळ तर बार्शी, करमाळा, परंडा आगाराच्या बसेससाठी मुंबई, पुणे, कोल्हापूर, पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांसाठी बार्शी रोडवरील महावितरण उपकेंद्राच्या शेजारी करण्यात आल्याचे वाहतूक नियंत्रक उमाकांत गायकवाड यांनी सांगितले.

### गैरप्रकार रोखण्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त



यात्रे दरम्यान गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलिस प्रशासनाचे सपोनि महेश क्षिरसागर यांनी यात्रेला उपविभागीय अधिकारी १, सपोनी,पोनि ४५, पुरुष पोलिस ३५०, महिला १५०, होमगार्ड ३००, महिला होमगार्ड १५० असा पोलिस बंदोबस्ताची मागणी केली आहे. यात्रेदरम्यान लोकसभा निवडणुका असल्याने बंदोबस्त किती मिळेल ते रविवारी समजेल असे सांगितले.

## शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या,स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तहसीलदारांना निवेदन

आरंभ मराठी/वाशी

तालुक्यात शासनाच्या वतीने दुष्काळ जाहीर करण्यात आला असून शेतकऱ्यांना कर्जमाफी व शेतातील वीजबिल माफ करावे, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे. शुक्रवारी तहसील कार्यालयात निवेदन आले. यावेळी ही मागणी करण्यात आली आहे.२०१९ नंतर नवीन शेतकऱ्यांची खाती तयार झाली असून, अशा नवीन शेतकऱ्यांना शेतकरी पगारीचा लाभ मिळण्यासाठी नोंदणीची प्रक्रिया सुरू करणे, केवायसीची अट रद्द करून शेतकऱ्यांना अनुदानाचा थेट खात्यात लाभ देणे, २०२३ सालच्या विम्याची राहिलेली रक्कम देणे, नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदान देणे यासह इतर मागण्याचे निवेदन तहसीलदारांना देण्यात आले. यावेळी ॲड. वसंत जगताप, संजय कवडे, गजानन भारती, नानासाहेब उंदरे, गोरख उंदरे, सचिन जगताप, पांडुरंग घुले, सुजित उंदरे, राम घुले, चंद्रकांत उंदरे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेद्वारे ५० गुणवंत विद्यार्थी जाणार इस्त्रोला

### १५ मे पर्यंत करू शकतात अर्ज, ९ जूनला होणार परीक्षा

आरंभ मराठी/धाराशिव

राज्यातील ५० हून अधिक विद्यार्थ्यांना भारतीय अवकाश संशोधन संस्था अर्थात इस्त्रोला जाण्याची संधी जळगावच्या नोबेल फाउंडेशन ने उपलब्ध करून दिली आहे. २०२४ साठी संपन्न होणाऱ्या या उपक्रमाचा प्रारंभ झाला असून, यासाठीची परीक्षा ९ जून २०२४ रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार आहे . विज्ञान व संशोधन क्षेत्राबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी नोबेल फाउंडेशन ही संस्था कार्यरत आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो), आयआयटी, आयआयएम यासारख्या उच्च शिक्षण संस्था अनुभवता याव्यात तसेच विज्ञान व गणित या विषयाचा पाया पक्का व्हावा यासाठी नोबेल फाउंडेशन तर्फे नोबेल सायन्स टॅलेंट सर्च परीक्षेचे आयोजन दरवर्षी करण्यात येते . इंग्रजी व मराठी माध्यमाच्या सर्व बोर्डाच्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा ९ जून २०२४ रोजी ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज करण्यासाठी www.nobelfoundation.co.in या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे . मागील वर्षी या परीक्षेद्वारे ६१ विद्यार्थ्यांची इस्त्रो,आयआयटी सहलीसाठी निवड झालेली होती.आजपर्यंत या योजनेच्या माध्यमातून ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी इस्त्रो ,आयआयटी भेटीचा लाभ घेतला आहे . या परीक्षेत गुणवत्ता यादी मध्ये येणाऱ्या प्रथम पन्नास विद्यार्थ्यांना निशुल्क इस्त्रो, आयआयटी, आयआयएम, सायन्स सिटी येथे अभ्यास सहलीला नेण्यात येणार आहे. गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीसाठी निवडण्यात येईल .या विद्यार्थ्यांना करिअरच्या संदर्भात उन्हाळी व हिवाळी शिबिरांचे आयोजन केले जाणार आहे. तसेच अवकाश विषयक पुस्तके भेट दिली जाणार आहेत. या परीक्षेसाठी पाचवी ते सातवी ,आठवी ते दहावी आणि अकरावी, बारावी डिप्लोमा असे तीन गट करण्यात आले आहेत. तिन्ही गटांसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका असून परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असणार आहे . या उपक्रमासाठी भवरलाल अँड कांताबाई जैन फाउंडेशन , ओमकार करिअर अकादमी ,निर्मल सीड्स , स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूल यांचे सहकार्य होणार आहे. याविषयी अधिक माहितीसाठी नोबेल फाउंडेशन प्रगती शाळेसमोर जळगाव



७२१८५०१४४४, ९९२२००४१९३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

## भाजपाचे संकल्पपत्र म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षांचे प्रतिबिंब आहे- केशव उपाध्ये



आरंभ मराठी/धाराशिव

भाजपाचे निवडणुकीतील संकल्पपत्र म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षांचे प्रतिबिंब आहे, असे मत प्रदेश भाजपाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. समान नागरी कायदा, एक देश एक निवडणूक, सत्तर वर्षांवरील प्रत्येक नागरिकास मोफत उपचार, तीन कोटी लखपती महिलांसह देशातील सर्व महिलांचे सक्षमीकरण, युवकांचा कौशल्यविकास आणि रोजगाराभिमुख उत्पादन नीती, गरीबांना आर्थिक बळ देण्यासाठी पाच वर्षे मोफत धान्य, प्रत्येक घरात पाईपद्वारे गॅस जोडणी, एक कोटी घराना मोफत सौरवीज, विनातारण आणि व्याजमुक्त कर्ज योजनेतून महिला व युवकांना उद्योगांस प्रोत्साहन, शेतकऱ्याना वार्षिक सहा हजार रुपयांचे अर्थसाह्य अशा विविध योजनांतून देशाला समृद्ध करणारे भाजपचे संकल्पपत्र म्हणजे काँग्रेससारखा आश्वासनाचा केवळ कागदी पेटारा नसून मोदी की गॅरेटी आहे, असा दावा उपाध्ये यांनी पत्रकार परिषदेत केला.

सुमारे सहा दशके देशावर सत्ता गाजवूनही काँग्रेसने देशातील गरीबी हटविली नाही, उलट दारिद्र्यरेषा गडद होत गेली. तरुणांना रोजगाराच्याच नव्हे, तर शिक्षणाच्या संधीदेखील नाकारल्या गेल्या. संविधानकर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सातत्याने अपमान केला, आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांची उपेक्षा केली, महिलांच्या उत्कर्षाच्या संधी नाकारल्या, आणि उद्योग व पायाभूत सुविधांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून देश गरीब व मागासलेला राहील याचीच दक्षता घेत जगासमोर हात पसरण्याचे धोरण पत्करून जनतेलाही दुर्ब मानसिकतेत ठेवले.

याउलट गेल्या दहा वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या द्रष्ट्या आणि विकासकेंद्री नेतृत्वामुळे, काँग्रेसने निर्माण केलेली प्रत्येक समस्या सोडवून देशाला समृद्धीचा मार्ग सापडला असून २०४७ पर्यंत जगातील सर्वात समृद्ध देश म्हणून भारत ताठ मानेने जगाच नेतृत्व करेल असा विश्वास मोदी यांनी दिला आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे संकल्पपत्र म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाच्या अपेक्षांचे प्रतिबिंब असून प्रत्येक अपेक्षा पूर्ण करणे हा आपला संकल्प असल्याची पंतप्रधान मोदी यांची गॅरेटी आहे, असेही उपाध्ये म्हणाले.

या संकल्पपत्रातील प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्ष संपूर्ण ताकदीने अथक परिश्रम करणार असून समाजातील शेवटच्या स्तरावरील व्यक्तीपर्यंत विकासाची फळे पोहोचवण्याचा पक्षाचा निर्धार आहे, अशी ग्वाही उपाध्ये यांनी दिली. धाराशिव लोकसभा मतदारसंघात महायुतीमध्ये योग्य सुसंवाद असून, पालकमंत्री डॉ तानाजी सावंत हे त्यांच्या मतदारसंघातून अर्चनाताई पाटील यांना भरघोस मतांची आघाडी देतील असा विश्वास उपाध्ये यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी पत्रकार परिषदेत भाजपा जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, नितीन काळे, राजसिंहा राजेनिंबाळकर, इंद्रजित देवकते यांच्यासह भाजपाचे नेते उपस्थित होते.

THIS LETTER PRINTED BY ADESH PRINTERS, RAMKRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED BY RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) ON BEHALF OF CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH AND PRINTED AT ADESH PRINTERS, RAM- KRUSHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST.DHARASHIV (MHARASHTRA) AND PUBLISHED AT RAMKRISHNA COLONY, GAWALI WADA, DHARASHIV, TQ. & DIST. DHARASHIV (MHARASHTRA) EDITOR SHRI. CHANDRASEN GOVINDRAO DESHMUKH.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८०